म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल-वाङ्मय
दा. क्र. ५३८९



IRBK 0105389
IRBK-0105389

# एकदाणी

सौ. शांताबाई दँडिगे

वा. कृ. - ५३८९

# एकदाणी

( कविता संग्रह )

सौ. शांताबाई दंडिगे

कॉण्टिनेण्टल प्रकाशन : टिळक रोड, पुणें.

प्रकाशक :

अ. अं. कुलकर्णी,
कॉण्टिनेण्टल प्रकाशन,
१९६/१९ सदाशिव, पुणें.

किंमत : दोन रुपये
सर्व हक्क कवयित्रिचे स्वाधीन
प्रथमावृत्ति : २६-१०-५५
विजयादशमी : शके १८७७

मुद्रक :

माधव धरणीधर गुर्जर,
आयुर्विद्या मुद्रणालय,
२६१/२ सदाशिव, पुणें २

आई

तुझीच पुण्याई तुझेंच हें धन
तुलाच सद्भावें करितें अर्पण

५३८९

IRBK-0105389

# ' मनोगत '

आजचें युग नवकाव्याचें आहे असें म्हणतात. प्रस्तुत काव्य नवकाव्य निश्चित नाहीं. परंतु त्यांत काव्य आहे किंवा नाहीं आणि असल्यास कितपत आहे हें रसिकांनींच ठरवावें. उत्कटतेनें वाटलें तेव्हांच माझ्याकडून कविता लिहिल्या गेल्या. कविता लिहिण्यामागें कोणताहि वाङ्मयीन वा सामाजिक हेतु नाहीं.

' गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंहि नसे थोडकें ' असें केशवसुतांनीं म्हटलें आहेच ना ?

संग्रह अल्पावधींत प्रकाशित केल्याबद्दल श्री. अ. अं. कुलकर्णी यांची, आणि संग्रह काढण्यासंबंधीं श्री. तात्यासाहेब सगदेव व सौ. प्रभाताई सगदेव यांनीं दिलेल्या सक्रीय उत्तेजनाबद्दल त्यांची मी अत्यंत आभारी आहे.

त्याचप्रमाणें मार्मिक प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल प्राध्यापक भ. श्री. पंडित यांचीहि मी अत्यंत ऋणी आहे.

शेवटीं कवितांचीं प्रुफें तपासल्याबद्दल व वेळोवेळीं समर्पक सूचना दिल्याबद्दल श्री. द. भि. कुलकर्णी यांचे आभार मानून मी माझें मनोगत संपवितें.

सीताबर्डी, नागपूर
ता. १६-१०-५५

शांताबाई दंडिगे

# प्रस्तावना

'किरणांप्रमाणें उज्ज्वल आणि निर्मल असणारीं अगणित रत्नें सागराच्या तळाशीं असलेल्या काळोख्या गुहांत पडून असतात, आणि असंख्य सुंदर फुलें जन-दृष्टीपासून दूर कुठेंतरी ओसाडीवर आपला मधुर परिमल उगाच उधळीत असतात' हे ग्रेचे अमर उद्‌गार कुणाच्याहि अनुभवाला पटतील असेच आहेत. लतेवर फूल फुलतें तें आपोआप फुलतें. 'फूल फुला! फूल–फूल फुला! फूल' असें त्यास विनवावें लागत नाहीं. तें सहजगत्या फुलतें आणि वाऱ्यावर झुलतें. त्याला आकार द्यावा लागत नाहीं, त्यांत रंग भरावे लागत नाहींत किंवा त्याच्या हृदयांत सुगंध ओतावा लागत नाहीं. परंतु त्या फुलाला स्वतःच्या गुणांची जाणीव नसते, म्हणून त्याला लतेवरून खुडून एखाद्या फुलदाणींत ठेवावें लागतें. कवितेचें अगदीं असेंच आहे. ती काव्यात्म व्यक्तीच्या हृदयलतेवर सहजासहजीं उगवते. तिला तेथून उचलून एखाद्या कवितासंग्रहांत स्थान दिलें म्हणजे ती रसिकांच्या दृष्टीस पडते आणि तिचें सार्थक होतें.

प्रस्तुत 'एकदाणी' या कवितासंग्रहाविषयीं असेंच म्हणावें लागेल. या संग्रहाच्या कवयित्री सौ. शांताबाई दंडिगे या आज कितीतरी दिवसांपासून कवितालेखन करीत आहेत. परंतु आपल्या निकटवर्ती परिचित मंडलाबाहेर त्यांनीं कवितेला फिरकूं दिलें नाहीं, म्हणून तिची आणि महाराष्ट्रीय रसिकांची भेटगांठ पडली नाहीं आणि ओळखदेख झाली नाहीं. त्यांच्या परिचितांपैकीं सगदेव पति-पत्नींनीं आपल्या प्रेमळ आग्रहाच्या बळावर तिला मंडलाबाहेर आणून रसिकां-समक्ष उभें केलें आहे, आणि तिची ओळख करून देण्याचें काम माझ्याकडे सोंपविलें आहे. तें स्वीकारतांना मला त्या सर्वांच्या आपुलकीमुळें आनंद व अभिमान वाटत आहे.

सौ. शांताबाईंच्या कवितेचें स्वरूप सुसंस्कृत आहे. तिच्यावर त्यांच्या खानदानी व्यक्तित्वाचे ठसे उमटले आहेत. त्यांचा जन्म सागरच्या इतिहास-प्रसिद्ध सुभेदार घराण्यांत झाला आणि त्यांचा विवाह नागपूरच्या इतिहास-प्रसिद्ध दंडिगे घराण्यांत झाला. सासर आणि माहेर दोन्हीं वैभवशाली! त्यामुळें तेथील परंपरागत उच्च विचार, आचार आणि उच्चार यांचे उठावदार संस्कार

त्यांच्या कवितेवर झाले आहेत. त्यांच्या कवितेंत शुभ कार्याचीं आणि मंगल प्रसंगांचीं जीं वर्णनें आहेत, त्यांतलि वातावरण दिव्य आणि भव्य आहे. त्यांतील दृष्टि व्यापक आहे आणि अंत:करण उदार आहे. परंतु परंपराप्रिय वातावरणांत लहानाच्या मोठ्या झालेल्या त्यांच्या कवितेला समतेचें नवयुग उगवत असल्याची चाहूल आहे हें विशेष ! आणि परंपरेच्या उपरोधानें त्यांनीं त्याचें स्वागतहि केलें आहे.

आम्ही राजाच्या हो पोरी नाही ठाऊक आम्हांला
कशी जीवाची काहिली कसा असतो उन्हाळा
जाईजुईचे मंडप थंड सुगंधित वारा
मखमाली पायवाटा नाहीं कांट्यांना हो थारा
आम्ही राजाच्या हो पोरी जग सारें महालांत
कल्पना त्या कशा याव्या काय चाले जगतांत ?
उंच सौधावरी जावें प्याव्या अमृताच्या धारा
आपल्यांत दंग व्हावें खालीं बघणें कशाला ?

सौ. शांताबाईंचें शालेय शिक्षण त्या काळच्या रूढीप्रमाणें इंग्रजी चवथी-पांचवीपर्यंत झालें आहे. शालेय शिक्षणापेक्षां त्यांनीं गृहशिक्षण अधिक घेतलें आहे. त्याचा एक इष्ट परिणाम असा झाला आहे कीं, त्यांची कविता विदेशी विचार व परके संकेत यांपासून अलिप्त आहे; आणि तिचें अंतर्बाह्य स्वरूप शुद्ध व सोज्ज्वळ राहिलें आहे. तिच्यांत श्रद्धा, निष्ठा, प्रेम, औदार्य, दाक्षिण्य, सौजन्य इत्यादि गृहस्थाश्रमी जीवनांतील गुणांचा मोठा मनोज्ञ व सर्वांगीण विकास झाला आहे. त्यामुळें तिचें वळण विमल व सरळ आहे. जुनें गृहजीवन आणि नवें गृहजीवन यांतील अंतर 'मला बाई ! नाहीं वेळ' आणि 'उसनी ऐट' या त्यांच्या दोन कवितांत अत्यंत सहृदयतेनें अभिव्यक्त झालें आहे. त्यांना दोन्ही जीवनाविषयीं प्रेम असलें, तरी आदर एकाच जीवनाविषयीं आहे. तो प्रकट करतांना त्यांनीं दुसऱ्या जीवनावर 'टीका' केली आहे. परंतु ती हळुवार हातानें गुदगुल्या करून केली आहे. तींत चिमकोऱ्या किंवा ओरखाडे नाहींत ! समाजांतील व्यंगावर बोट ठेवतांना विनोदाचा वापर अमोघ ठरतो हें सत्य सौ. शांताबाईंनीं बरोबर लक्षांत घेतलें आहे. त्यांच्या कवितेची प्रकृति गंभीर आहे, परंतु उग्र नाहीं.

जीवनांत रस आहे हें तिला माहीत आहे. म्हणूनच तिला हारयाचें वावडें नाहीं. मात्र ती आपल्या स्वभावास साजेल अशा रीतीनें तें मर्यादेंत ठेवतें.

प्रस्तुत संग्रहांत कांहीं कविता प्रासंगिक आहेत. पण म्हणून त्यांचें महत्त्व कमी आहे असें नाहीं. स्त्री हीच गृहाची प्रतिष्ठा! संसार हा स्त्री आणि पुरुष उभयतांचा असला, तरी स्त्रीचा गृहाशीं जसा चोवीस तास संबंध असतो, तसा तो पुरुषाचा नसतो. त्यामुळें गृहजीवनांत प्रतिवर्षी येणारे प्रसंग स्त्रीच्या दृष्टीनें आदराचे व आनंदाचे असतात. निरनिराळ्या पूजाअर्चा, व्रतवैकल्यें, सणवार, मंगलकार्यें इत्यादिकांची महती तिला विशेष वाटते. तिच्या जीवनाचा तो एक अविभाज्य भाग असतो. त्यामुळें तिला अशा जिव्हाळ्याच्या प्रसंगीं कवितेची स्फूर्ति होते. आपल्या समाजांत हे प्रसंग घरोघर पिढ्यान्‌पिढ्या पुनरावृत्त होत असतात. तेव्हां त्या दृष्टीनें या प्रासंगिक कविता उपयुक्त आहेत. त्यांतील भक्तिभाव व्यक्तिगत असला, तरी त्याचें साधारणीकरण झालेलें असतें. त्यामुळें साऱ्या समाजांत त्या प्रकारच्या कवितांचा झपाट्यानें प्रसार व प्रचार होतो. अशा प्रासंगिक कविता रचून सौ. शांताबाईंनीं मराठी साहित्यांत एक निराळी व नवी भर टाकली आहे. याबद्दल त्यांचें अभिनंदन आवश्यक आहे.

सौ. शांताबाईंच्या कवितेचा आणखी एक विशेष असा कीं ती पूर्णतया 'बायकी' आहे. माझ्या म्हणण्याचा आशय असा कीं तिचें इमान शाबूत आहे. आपल्या जीवनाशीं ती प्रामाणिक आहे. कित्येकदां आपण स्त्रियांच्या नांवावर असलेल्या कांहीं कविता वाचतों, परंतु त्यांतील भाव 'पुरुषी' असतो. स्त्रीच्या वृत्तीशीं तो विसंगत असतो. सौ. शांताबाईंच्या कवितेची गोष्ट तशी नाहीं. या संग्रहांतील कोणतीहि कविता उघडून वाचा. तिच्यांत तुम्हांला स्त्रीच्या भावनेचें दर्शन होईल. कन्या, भगिनी, पत्नी आणि माता हे स्त्रीच्या जीवनाचे निरनिराळे पैलू आहेत. त्या पैलूंचें तेज या कवितासंग्रहाच्या पानापानांतून दिसेल. 'फूलामध्यें फूल–फूल हुंगावें जाईचें, सुख भोगावें आईचें बालपणीं'– असे उद्गार कुण्यातरी अज्ञात कवयित्रीनें एका लोकगीतांत काढले आहेत. त्यांची यथार्थता सौ. शांताबाईंच्या वाणींतहि प्रत्ययास येईल. दुर्दैवानें सौ. शांताबाईंनाहि मातृसुख फार दिवस लाभलें नाहीं. त्यामुळें त्यांनीं आईला उद्देशून कृतज्ञभावानें कांहीं कविता लिहिल्या आहेत. त्या अतिशय करुणकोमल आहेत. त्यांच्या व्यथित अंतःकरणाला आईच्या प्रेमाची ओढ इतकी आहे कीं, निसर्गांतहि त्या त्याचा शोध घेतात--

निजमातेच्या अंकावरती घेतांना झोके
पुलकित होई कोमल तनु ही, नित्य दिसे मातें
प्रेमलाभ हा तुझ्यासम मला कधि न मिळायाचा
या सौभाग्या मुकलें बघ मी, मौन धरी वाचा

या ‘ गुलाबाच्या फुलास ’ अनुलक्षून लिहिलेल्या ओळींत त्यांच्यांतील ‘ मातृविहीन कन्या ’ किती सहजासहजीं अवतीर्ण झाली आहे ! ‘ भगिनी-स्वागत ’ या त्यांच्या कवितेंत ‘ स्नेहाळ भगिनी ’चें दर्शन घडतें. ‘ हृदयाची राणी ’ ही त्यांची सुरेल कविता पति आणि पत्नी यांच्या प्रेमाच्या परिपूर्तीनें ओतप्रोत ओसंडत आहे--

सहस्र लाटा तुझ्या संगतीं, घ्याया उत्सुकता
कशास करिसी विलंब चल ये, दे लौकर हाता
खेळत खेळत जाऊं चल ये, सखोल पाण्यांत
बुडतां मी जरि तारशील हा हृदयीं विश्वास
आनंदानें आलें बघ हें डोळ्यांला पाणी
मी तर राया तव हृदयींच्या हृदयाची राणी

हे चरण आळवतांना कुणा बरें सुखी दंपतीचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येणार नाहींत ? त्यांच्यांतील ‘ मायाळू माता ’ अनेक कवितांत मोठ्या समाधानानें हालचाल करतांना आढळते--

नको बाळे लपवूं ग ऽ मनांतील तूं गुपित
प्रतिबिंब उमटले डोळे तुझे सांगतात
मिटलेल्या पाकळ्यांना कुणी दिलं ग ऽ जीवन ?
सांग गडे ! सांग मला सांग तुझा सखा कोण ?
जीवनाच्या सतारीच्या कोण छेडते ग ऽ तारा ?
नाच तुझ्या मुखावर, आंदोलन देई वारा !
सौजन्याची साधी ठेव आईनें ग ऽ दिली हातीं
फिके सारें त्याच्यापुढे माणिक नी हिरे मोती

या त्यांच्या ओंव्यांतील ‘ आई ’ कुणा मुलीला भुरळ पाडणार नाहीं ? कुटुंबजीवनांतून उद्रेक पावलेल्या या त्यांच्या कविता कुणाहि रसिकाच्या हृदयास स्पर्श करतील अशा भावमधुर उतरल्या आहेत.

वात्सल्य हा मातृत्वाचा विशेष आहे. स्त्रीजन्माचें साफल्य वात्सल्यांत होत असतें. अशा या गौरवास्पद वात्सल्याला अनुलक्षूनहि सौ. शांताबाईंनीं कांहीं लहान लहान कविता लिहिल्या आहेत. लहान मुलांच्या मनांत देवाच्या थोरवीचें बीज रुजावें म्हणून कितीतरी कवींनीं कितीतरी निरनिराळ्या प्रकारच्या कविता रचल्या आहेत; परंतु सौ. शांताबाईंची 'जादूगार' ही साधी, सोपी आणि स्मरणसुलभ कविता वाचली म्हणजे त्या साऱ्या कविता फिक्क्या वाटूं लागतात;–

निळ्या निळ्या आभाळांत देवाजीचें मोठें घर
खांबावीण उभारलें मंदिर हें छानदार
दिनीं सूर्य होवोनीया प्रकाशतो घरोघर
नियमाने सायंकाळीं होतो चांदोबा सुंदर
मेघ होवोनी पाडतो पाऊस हा सरसर
अन्न मिळे आपणाला थोर याचे उपकार
रोज रोज भेटतसे देवबाप्पा जादूगार
शक्तिबुद्धीचा हा दाता करूं याला नमस्कार

सौ. शांताबाईंचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निर्मळ आणि निकोप आहे. जीवनांत ज्याप्रमाणें 'हासूं' आहे त्याचप्रमाणें 'आसू' आहेत हें त्या जाणतात. परंतु हे 'आसू' जसे उष्ण असतात तसेच शीतल असतात यांची त्यांना चांगली जाणीव आहे. जीवन हें मंगलमय आहे ही त्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच 'नशिबाचे खेळ' यासारख्या एखाद्या कवितेंत त्यांची वृत्ति शोकसंविग्न दिसली, तरी 'अश्रुबिंदूस' यासारख्या कवितेंत त्या मोठ्या धैर्यानें आणि आशेनें 'अश्रूं'ना बजावतात कीं–

करील तुमचें आत्मार्पण जो प्रेमानें मान्य
हृदयीं त्याच्या विलीन होउनि, व्हा तुम्ही धन्य
सोडुं नका निजस्थान आपुलें, राहोनी नयनीं
तेज पसरवा, तेज खेळवा, तेजस्वी पाणी
हृदयाचें प्रतिबिंब उमटण्या साधन हे डोळे
ठाउक नाही काय तुम्हाला, परतुनि जा सगळे
एकजुटीनें काम करा मग येइल नवतेज
नका अश्रुंनो, नका घालवूं जीवाचा साज.

सौ. शांताबाईंची वृत्ति ही जात्याच भाविक आहे. ईश्वराच्या अस्तित्वावर त्यांची श्रद्धा आहे, म्हणूनच 'पूजे'सारखी भक्तिभावाची कविता त्या आळवतात; आणि–

आज गोड सुखस्वप्नें साकारलीं माझीं सारीं
रसरशीत या केळी डोलतात माझ्या दारीं
हिरवीं हीं रुंद पानें रुंदावल्या भाग्यरेषा
जीवनाच्या सायंकाळीं काय प्रकटली उषा ?
आलें एक केळफूल घड केळीचा डोलतो
भाग्यवृक्ष बहरला चांफा मनींचा हासतो.

असे कृतकृत्यतेचे व धन्यतेचे आनंदोद्गार त्या 'चाफा मनींचा हासतो' या कवितेंत काढतात.

सौ. शांताबाईंचे भाव शुद्ध आणि सरळ आहेत. त्यांना साजेशीच त्यांची भाषा साधी पण सुंदर आहे. तिच्यांत नटवेपणा अथवा नखरा नाहीं. त्यांच्या रचनेंत डौल आहे पण तो शालीनतेचा आहे. आपल्या कवितासंग्रहास 'एकदाणी' हें नांव देतांना ती शालीनता व्यक्त झाली आहे–

लाखेनें भरले मणी, घडविली ही 'एकदाणी' नवी
आहे यांत सुवर्ण अल्प बघ हें, जाणीव आहे मनीं
पै, पैसा जमवोनि एक हलका, केला असे दागिना
शक्ती ही अजमावुनी भगवती, मानून घेशील ना ?

शास्त्रीय दृष्टीच्या कांटेकोरपणांत क्वचित् त्यांच्या रचनेंत दोष दिसण्याचा संभव आहे. परंतु रसास्वाद घेतांना रसिक हा पेल्यावरील नक्षकाम पाहात नसतो. त्याला केवळ रसाची रुचि हवी असते. आणि ती या संग्रहांत भरपूर आहे. ती चाखल्यावर तो पुढील संग्रहाची आतुरतेनें वाट पाहात बसेल अशी माझी पक्की खात्री आहे.

स्टेशनरोड, अमरावती
ललितापंचमी २०–१०–५५
भवानीशंकर पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# अनुक्रम


| | विषय | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | एकदाणी | ... | ९ |
| २ | गुलाबाच्या फुलास | ... | [illegible] |
| ३ | अश्रुबिंदूस | ... | ११ |
| ४ | दीपविसर्जन | ... | १२ |
| ५ | विनवणी | ... | १४ |
| ६ | वसुधेचें वैभव | ... | १६ |
| ७ | दैवास | ... | १८ |
| ८ | प्रतिबिंब | ... | २० |
| ९ | संगम | ... | २२ |
| १० | भगिनी-स्वागत | ... | २३ |
| ११ | हृदयाची जाणीव | ... | २५ |
| १२ | गंगास्नान | ... | २७ |
| १३ | हरितालिकास्तवन | ... | २८ |
| १४ | त्रिवेणी संगम | ... | २९ |
| १५ | उसनी ऐट | ... | ३० |
| १६ | पूजा | ... | ३३ |
| १७ | माहेरचें मूळ | ... | ३५ |
| १८ | आई | ... | ३६ |
| १९ | रक्षाबंधन | ... | ३७ |
| २० | नंदादीप | ... | ३८ |
| २१ | बाळलीला | ... | ३९ |
| २२ | आशा | ... | ४० |

| | विषय | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २३ | गुपित | ... | ४१ |
| २४ | गूढ असें मोठें | ... | ४२ |
| २५ | नशिबाचे खेळ | ... | ४३ |
| २६ | गत—स्मृति | ... | ४४ |
| २७ | विकास | ... | ४६ |
| २८ | विकासला आशीर्वाद | ... | ४७ |
| २९ | जादूगार | ... | ४८ |
| ३० | गोड दूध | ... | ४९ |
| ३१ | मला बाई नाहीं वेळ | ... | ५० |
| ३२ | आम्ही राजाच्या हो पोरी | | ५१ |
| ३३ | समुद्रशोभा | ... | ५२ |
| ३४ | सृष्टिदेवतेस | ... | ५३ |
| ३५ | हृदयाची राणी | ... | ५४ |
| ३६ | शपथ | ... | ५५ |
| ३७ | चाफा मर्नीचा हासतो | ... | ५६ |
| ३८ | सुंदर कला | ... | ५७ |
| ३९ | अंतिम इच्छा | ... | ५८ |
| ४० | सु—मन माळ | ... | ५९ |
| ४१ | कवितेस | ... | ६१ |
| ४२ | विहीण | ... | ६२ |
| ४३ | आस | ... | ६४ |
| ४४ | कृतज्ञता | ... | ६५ |
| ४५ | काळ | ... | ६६ |
| ४६ | महाराष्ट्र शारदेस | ... | ६८ |
| ४७ | रांगोळीस | ... | ६९ |
| ४८ | हृदयाचें सिंहासन | ... | ७० |
| ४९ | देवीस्तवन | ... | ७१ |

१

# एकदाणी

लाखेनें भरले मणी घडविली, ही एकदाणी नवी
आहे यांत सुवर्ण अल्प बघ हें, जाणीव आहे मनीं
पै, पैसा, जमवोनि एक हलका, केला असे दागिना
शक्ती ही अजमावुनी भगवती, मानून घेशील ना ?

पोहे एकच मूठ देइ प्रभुला, प्रेमें सुदामा जरी
लाखाची बहुमोल भेट म्हणुनी, श्रीकृष्ण ती स्वीकरी
भक्ती प्रेम अभंग दावित असे, साधीसुधी बैठक
सांगूं काय पुन्हा पुन्हा विनवुं मी, सारें तुला ठाउक.

पाचू, लाल सुवर्ण माणिक हिरे, आहेत अंगावर
रत्नें मौक्तिक इंद्रनील किमती, तूं घालिसी सुंदर
गाभारा भरला प्रभावळ तुझी, सारेच रत्नांकित
दीप्तीनें दिपवी निधी जग पहा, झालें असे मोहित

सारें मान्य मला परी भगवती, हेतू असे सान हा
राहूं दे तुझिया गळ्यांत तरिहि साधा अलंकार हा

◆ ◆ ◆

# गुलाबाच्या फुलास

कोमल पुष्पा, निर्मल पुष्पा, मृदुल पुष्पराजा
गुलाब पुष्पा, सुंदर पुष्पा, जीवाच्या कलिजा
दंवबिंदूच्या प्रेमजलानें न्हालेली काया
पवित्रतेच्या साक्षात्कारा दावितसे हृदया ?
निजमातेच्या अंकावरती घेतांना झोंके
पुलकित होई कोमल तनु ही, नित्य दिसे मातें
प्रेमलाभ हा तुझ्यासम मला कधि न मिळायाचा
या सौभाग्या मुकलें बघ मी, मौन धरी वाचा
दैवाचें हें लिखित असे, जें कधि न टळायाचें
शोक कशाला वृथा मग असा हें सारें कळतें
बरें जाउं दे ! एक विनंती ऐक गड्या आतां
तव हृदयिंची निर्मलता दे क्षणभर या चित्ता
करीन पूजन शांतिदेवता प्रसन्न व्हायाला
तुझ्या संगतीं चल ये, विसरूं क्षणभर जगताला

◆ ◆ ◆

१० : ११

३

# अश्रुबिंदूस

नयन सोडुनी कशास येतां अश्रूंनो खालीं ?
आहे का जगिं किंमत कोणा, कोण भाग्यशाली ?
करील तुमचें आत्मार्पण जो प्रेमानें मान्य
हृदयीं त्याच्या विलीन होउनि, व्हा तुम्ही धन्य
अमोल धन हें असें लुटवितां कशास हो वायां ?
नसे जगाला तिळहि कल्पना तुडविल हें हृदया
सोडुं नका निजस्थान अपुलें, राहोनी नयनीं
तेज पसरवा, तेज खेळवा, तेजस्वी पाणी
हृदयाचें प्रतिबिंब उमटण्या साधन हे डोळे
ठाउक नाही काय तुम्हांला, परतुनि जा सगळे
एकजुटीनें काम करा मग येइल नवतेज
नका अश्रुंनो, नका घालवूं जीवाचा साज

◆ ◆ ◆

वदनचंद्रमा पाहुनि विमले
चंद्रविकासी प्रफुल्ल कमलें
काय उमललीं पात्रीं सरितें ?
तव निर्मल हृदयीं हृदय जडे
हा थाट कशाचा सांग गडे ?

नील नभींच्या दिव्य चांदण्या
तुज भेटाया भूवरि आल्या
नवतेजानें तारा नटल्या
प्रकाश पडला चहूंकडे
हा थाट कशाचा सांग गडे ?

नंदनवनिंचीं गोड फुलें हीं
तुजवरती ग कुणीं उधळिलीं
दृष्ट कुणीं ही सांग काढिली ?
पुष्पांचे हे पडति सडे
हा थाट कशाचा सांग गडे

आकाशांतुनि दिव्य अप्सरा
पुष्पवृष्टि कां करिती साऱ्या ?
हर्ष पावली सृष्टी माता
कुरवाळाया येइ पुढें
हा थाट कशाचा सांग गडे ?

◆ ◆ ◆

## ४

# दीपविसर्जन

वद नटुनि चालली कुणीकडे
हा थाट कशाचा सांग गडे ?

रम्य सुमंगल निशा पातली
अवखळ सरिते, कुठें चालली ?
खळखळ पैंजण वाजति पायीं
हातिं शोभती हरित चुडे
हा थाट कशाचा सांग गडे ?

काय नेसली राजसबाळी
बुट्ट्यांचा शालू चंदेरी
रंगछटा ही अलोट खुलली
सौंदर्याला तेज चढे
हा थाट कशाचा सांग गडे ?

कोमल कंठीं काय घातली
रत्नजडित ही माळ मोहिनी
अवर्णनिय ही शोभा नयनीं
बघुनि मनाला मोह पडे
हा थाट कशाचा सांग गडे ?

## ५

# विनवणी

तुज किती विनवुं मी थांब जरा
जाइ दूर करूं दे मार्ग पुरा.

संसाराची सरिता सुंदर
जीवननौका त्यांत मनोहर
वादळ उठलें घोर भयंकर
जाउं कशी मी पैलतिरा
जाइ दूर करूं दे मार्ग पुरा

अर्धिहि अजुनी वाट न सरली
हिरवी हिरवळ भंवतीं खुलली
काळ भुजंगा येउनि धरली
वाट सुखाची सोड धरा
जाइ दूर करूं दे मार्ग पुरा

आयुष्याचें चित्र मनोहर
रंगविलें हें हृदयपटावर
कराल हस्तें पुसण्या तत्पर
सांग कशाला करिसी त्वरा
जाइ दूर करूं दे मार्ग पुरा

चिमणी बाळें अनाथ होतिल
दारुण दुःखें करपुन जातिल
कोमल पुष्पें सारीं सुकतिल
आटविसी कां प्रेम झरा
जाइ दूर करूं दे मार्ग पुरा

मम जीवाची ही संजीवनी
सौभाग्याचा दिव्य दिनमणी
मावळतो कां येई रजनी
नेउं नको रे प्राण हिरा
जाइ दूर करूं दे मार्ग पुरा

उदार हृदया म्हणती तुजला
करुणा नच ये तव हृदयाला
कंठहि सुकला भोळी बाला
उघडुं नको रे नेत्र पुरा
जाइ दूर करूं दे मार्ग पुरा

पुनः पुन्हां ही तुला विनवणी
आवरि पाशा कृपा करोनी
जीवाचें हें मोल तुला मी
सिद्ध द्यावया ऐक जरा
जाई दूर करूं दे मार्ग पुरा.

◆ ◆ ◆

६

# वसुधेचें वैभव

हिरवीं पिवळीं शेतें खुललीं
अपूर्व शोभा वसुंधरेची

स्नान घातलें जलधारांनी
निघे न्हाउनी वसुधाराणी
हरित भरजरी वस्त्रें ल्यालीं
भारावलिहि फळाफुलांनी

गगनीं आलें इंद्रधनुष्य
मंगल सूचक मंगल चिन्ह
विजा चमकतीं, मेघ गर्जती
आशीर्वचनें गगनश्रीचीं

रुणझुणली ही चाल कुणाची !
कोण येतसे गजगामिनि ही ?
स्वस्थल सोडुन सुंदर सागर
लक्ष्मी आली ही भूमीवर

सजवायाला वसुंधरेला
हासत डोलत आली कमला
अंकीं बसली गोड किशोरी
मंगल मंगल गाई गाणीं

खुदकन् हसली गोंड किशोरी
हास्यामधुनी मोतीं उधळी
लक्ष्मीनें मधुदृष्ट काढली
घेउनिया निज पदराखालीं.

◆ ◆ ◆

७

# दैवास

दैवा तुझी न कळते मनुजास लीला
घेईल जो अनुभवा; उमजे तयाला
पाहोनिया तव कृती मति होइ गुंग
दैवा कशास करिसी खलकर्म सांग ?

कोणी सुधा भरुन घेउनि हातीं पेला
जो लाविला न वदनीं, हिसकोनि नेला
जेवावयास बसला कुणि अन्न घेई
घेणार घांस म्हणतां विषपूर्ण होई.

पुष्पें कुणी पसरुनी मउ शेज केली
जों झोंपणार, खल नागिण त्यांत गेली.
दैवा ! दिलेंस मनुजा जरि रत्न थोर
हातांतुनी हिसकलें, मनिं होइ घोर.

नौकाविहार करण्या कुणि रे निघाला
वारा तुफान सुटला अपघात झाला.
आशा कितीक मनिं योजुनि कोणि ठेवी
एका क्षणांत करिसी झणिं भग्न तूंही

स्वप्नांमधेंहि खलकर्म कधी न केलें
चिंतोनि दुष्ट, कटु शब्द कधी न बोले.
त्या शांत थोर हृदया तुडवोनि पायीं
तूं हासतोस, करुणा नच लेश येई.

देवादिका बुडविलें सरिताप्रवाहीं
टाळावयास तुजला मुळिं शक्ति नाही.
वर्णावयास तव थोर अगम्य लीला
सामर्थ्यही बघ नसे मज, मंदबाला.

◆ ◆ ◆

## ८

# प्रतिबिंब

तुज कुणीं शिकविली चित्रकला ?
सांग सांग भगिनी सांग मला.

रूप तुझें हें अतुल मनोहर
हृदय तुझें ग नितांत सुंदर
रंगविसी का हृदयपटावर
इंद्रपुरीची नृत्यकला ?
सांग सांग भगिनी सांग मला.

नील नभींचा गोड चंद्रमा
पवित्रतेची शांत पौर्णिमा
सौंदर्याची झाली सीमा
रंगविली कां इंदुकला ?
सांग सांग भगिनी सांग मला.

रजनीचें हें अमोल वैभव
अनंत तारा रत्नें अभिनव
चितारिसी कां हृदयपटावर
हळूहळू ग दिव्य कला ?
सांग सांग भगिनी सांग मला.

आकाशींचा मधुर नीलिमा
हृदयाचा तव गोड नीलिमा
दो हृदयींचा संगम झाला
स्वर्ग येइ कां भूमितला ?
सांग सांग भगिनी सांग मला.

अमर कलाकृति अपूर्व नामी
बघुनि जाहलें गुंग पुरी मी
अखंड हृदयीं ठेविन जपुनी
हृदयंगम ही चित्रकला
सांग सांग भगिनी सांग मला.

शुभ्र स्फटिकमय जीवन निर्मल
मानस निर्मल नीरहि निर्मल
उमटावें प्रतिबिंब कां न मग
गूढ उकललें सत्य मला
सांग सांग भगिनी सांग मला

◆ ◆ ◆

९

## संगम

मंद वाहतो समीर, धवल चांदणें खुलें
पूर्णचंद्र ये नभांत, हंसति तारका फुलें

चंद्रराज हासला खेळतात तारका
बघुनि सागरा तुझेंहि अंतरंग हासलें

शुभ्र फेंस चांदणें फुलविलें खुल्या मनें
अमृत मधुर फेंकतोस, काय अंतरांतलें ?

रत्नसंग्रही खरा असासि तूंच सागरा
मज अमोल ' शांति ' देइ, रत्न तेज फांकलें

रम्य खेळ हा तुझा अंत ना तया कदा
परत जाउं दे मलाच मोह हा उचंबळे

दूर जाउं मी कशी ? सांग ना गडे शशी
चंद्रसिंधु संगमांत, अंतरंग रंगलें.

◆ ◆ ◆

२२ : २३

## १०

# भगिनी–स्वागत

काय सांगूं बाई तुला कारण ग आनंदाचं
मानलेल्या भावाकडे झालं स्वागत प्रेमाचं.

बसायला दिला पाट वैनी माझी ग प्रेमळ
भाऊराया बोलवाया आंत गेली आनंदानं.

आला गात नी हांसत " बाई माझा भाऊराजा
नमस्कार केला त्यांनी राखिला ग मान माझा.

आशीर्वाद मींहि दिला चिरंजीव व्हा हो दोघे
होवो संसार सुखाचा पुढें या हो कीर्तितेजें–"

सांगितलें सुखदुःख केल्या बाई गुजगोष्टी
मनांत मीं इच्छिलें ग व्हाव्या नित्य अशा भेटी.

मांडीवर दिली बाई गोजिरी ग गोड लेक
रूप तिचें सांगु काय ? केलें भारी मीं कौतुक.

काळेभोर मोठे डोळे नीलप्रभा आकाशाची
कपाळाला लावली ग तीट वाटे नक्षत्राची.

चंद्रकोर का चंद्राची ? गौरवर्ण केतकीचा
नाक जशी चाफेकळी वर्णायाला नाहीं वाचा.

ओठ लाल, गाल लाल रंग गोड गुलाबाचा
हातपाय हालवितां भास होई कमळाचा.

एकदाणी

चोखतांना वाटे मुठी अमृताची गोड ठेव
द्याया नाहीं विसरला लाडकीला बाई देव.

हांसतांना गालावर पडतात गोड खळ्या
भाग्यवान पोर आहे सुचविती वेळोवेळां.

बाळलेणें कांहिं नाहीं घातलें ग सोनियाचें
बाळसें ग लोभस तें घर त्यांचें भूषवितें.

मूर्ति सान कीर्ति मोठी गुणाची ग लेक गोड
खरं खरं सांगतें मी लाविलें ग जीवा वेड.

जन्मलें ग त्यांच्या घरीं वाटे मूर्तीमंत काव्य
'कविता' हें आवडिनें ठेविलें ग गोड नांव

दृष्ट माझीच होइल भीतीनें मी परतलें
परि काय सांगुं बाई मन तेथें विसावलें.

◆ ◆ ◆

## ११

# हृदयाची जाणीव

ग्रंथ संग्रहालय, ठाणे

घालुं नको तूं मोह मला हा, दूर जा गडे दूर जरा
ठाउक आहे प्रताप सगळा, अभिलाषे गे ! मला पुरा.

चित्र कुणीं रेखियलें अभिनव, जाउनि तेथे रंगाचा
क्षणांत करिसी भंग, तुझा हा विनोद कसल्या कामाचा ?
शिल्पकार कुणि शिल्पकलेच्या दिव्यपूजनीं ग रमला
लगबग येउनि उधळुन देसी, डाव तयाने मांडियला.
हृदयिं बहरल्या नवनव आशा, आकांक्षांचा होत चुरा
ठाउक आहे प्रताप सगळा, अभिलाषे गे ! मला पुरा.

मोहवती तूं, मोहक भाषा, सौंदर्याची सम्राज्ञी
जादुगिरी ही मोहुनि टाकी, अखिल जगाला वचनांनी
काव्यदेवता सजवायाला शब्दसुमें करि कवि गोळा
भरतां परडी हळुच येउनि, ठेवितेस मग वर डोळा
मोहपूर्ण तव पाश सुंदरी, सैल करीं जा दूर जरा
ठाउक आहे प्रताप सगळा, अभिलाषे गे ! मला पुरा.

ग्रंथकार कुणि ग्रंथ रचाया, जमवी अनुकुल साहित्य
ओतणार जो अंतर करिसी, खंड कशाला वद सत्य ?
ध्येयमंदिरीं कलाकारही जाया कुणितरी गे सजला
पसरुनि जाळें मार्ग रोखिसी, करिसी कां असला चाळा ?
रंगाचा बेरंग होतसे जीवनमौक्तिक होत चुरा
ठाउक आहे प्रताप सगळा, अभिलाषे गे ! मला पुरा.

एकदाणी

सुखदु:खाच्या पडछायांनी जीवनपट हा बघ भरला
रंगसंगती दिसे न कोठे, मार्ग कठिणतर हा उरला
काव्यसुधेची मधु अनुभूति घ्याया जीवहि आतुरला
ऐक विनंती कृपा कर सखी, सहस्र नमनें नित्य तुला
गेला गेला दिन हा वायां, आतां करुं दे मार्ग पुरा
ठाउक आहे प्रताप सगळा अभिलाषे गे! मला पुरा.

◆ ◆ ◆

१२

## गंगास्नान

आलें बाई मी माहेरीं गंगा माईच्या कुशींत
जळधारा डोईवरी मृदु आईचे कीं हात
तरंग ग लक्षावधी वात्सल्याचा प्रेमपान्हा
पिऊनिया तृप्त झालें नवलाई वर्णवेना
लाटांचे हे हेलकावे पाळणा ग मनोहर
हालविते डोलविते अंगाई ही चेतोहर
मायेचं ग पांघरूण झोप लागणार शांत
हरपलें देहभान विश्वशांत चित्त शांत

◆ ◆ ◆

१३

## हरितालिकास्तवन

हरितालिके हे गिरीबालिके गे, जगत्पालिके तूं जगन्मोहिनी
तुझ्या पूजनाला नटे ही वनश्री, मना घालिते गोड संमोहनी.
मजेदार राजा फुलांचा हंसे हा, गुलाबी खुले पाकळी पाकळी
हंसे मंद हा कंद गालांत देवी, खुले ही फुलांच्या मनाची कळी.
पहा येत प्राजक्त हा स्वर्गिचा गे ! सडा घालितीं हीं फुलें अंगणीं
भरे दिव्य सौंदर्य मांगल्य सारें पहा, तेंच ओसंडते लोचनीं
मधूमालती ही चमेली सुगंधी, कपोली हसे शिंपिते अत्तर
किती गुंफिती हार हे साजिरे या अहा ! रम्य जाई-जुई सुंदर
फुले सोनचाफा ! सखे सोनियाचीं तुझ्या वेणिसाठीं फुलें मोहक
निशीगंध थाटांत डोले मुदें हा सुखें झोकितो गंध उन्मादक
खुले लाल जास्वंद सौंदर्यशाली, फुले पान-पानीं पहा, तेरडा
हसे मुग्ध सौंदर्य, नाविन्य दावी अहा ! ऐन रंगांत ये केवडा
फुले बांधिती भव्य पूजा तुझी ही तुला भक्तिभावें मनें अर्पिती
महन्मंगले ! रातराणी पहा ही तुला शांत ओवाळिते आरती
मनोमंदिरीं आपुल्या पूजिलें मीं तुला भाव पुष्पांजली अर्पुनी
मला देवि ! सौभाग्य दे आणि सेवा तुझी येवढी गोड घे मानुनी

◆ ◆ ◆

२८ : २९

## १४

# त्रिवेणी संगम

त्रिवेणि संगम बघुनि मनोहर गुंग मती झाली
आनंदाने हृदय वधिरलें, क्षुधा तृषा हरपली.
खळखळ वाहे गंगाजल हें निर्मळ शुभ्र दिसे
शांत संथ ही यमुना वाहे, काळीभोर दिसे.

गुप्त वाहतें सरस्वती ही दिसे न नयनांला
एकमेकिंना मुदें भेटिती संगम तो झाला.
हासत नाचत पहा चालली ही गंगा बाला
अल्लड बालिश मधुलीलेने मोहवि हृदयाला.

बालजीवनसम जळ गमतें, निर्मळ गंगेचें
शांत नील गंभीर दिसे का जल हे यमुनेचें ?
यमुनेकांठीं खेळ खेळला श्यामल वनमाळी
किंवा वधिला दुष्ट कालिया म्हणुनी हो काळीं ?

यमराजाची भगिनी यमुना ही काळी काळी
हिमनगउदरीं जन्मा आली ही गंगा बाळी.
विमल असे ती निर्मळ जीवन पावन करि जगता
तोषवि सकलां मोहवि हृदया, वंदन करि ' शांता '.

◆ ◆ ◆

## उसनी ऐट

हुरळुन गेलं खरंच ग मन
आलं मजला गडे निमंत्रण
अध्यक्षांचं पद मानाचं
शोभवायचं, खास अमंत्रण.

स्वारि इकडची फार 'पाप्युलर'
कां न मिळावा मान खरोखर ?
मित्रांचा परिवारहि मोठा
दिनभर अड्डा, ठोकति गप्पा

विषय दिला ग अतिशय सुंदर
वरुनि दिला मीं उगिच नकार
परि अंतर्मन हपापलेलें
'संधि न येइल पुन्हा' म्हणालें.

हो, ना, हो, ना करतां करतां
तारिख ठरली बघतां बघतां
काय करावें, काय लिहावें
कांहि सुचेना, कसें जमावें ?

ऐट आणिली विद्वत्तेची
घाबरगुंडी उडे मनाची
एकुलती मग सुचली युक्ति
शेजारिणिवर आहे प्रीति

चहा फराळा देउनि तिजला
कांहि कल्पना लिहुनी ध्याव्या
कागद घेउनि, मुद्दे काढुनि
जागुन जागुन पानें लिहिलीं.

आठ मुलांचें करुनी जेवण
पाठ करित मी अपुलें भाषण
विषय घेतला ' संततिनियमन '
बोलायाला पुष्कळ कारण.

रात्रंदिस बघ एकच ध्यास
मनांत करि मी माझें कौतुक
तारांबळ बघ कशी उडाली
आली न्याया मोटरगाडी.

चेहेरेपट्टी नीट सजविली
पावडर कुंकू, बदलुनि साडी
बांधुनि, हातीं घड्याळ सुंदर
हातिं घेतली पर्स मनोहर.

पायांमध्यें घालुनि सँडिल
नखरा केला गडे पुरेपुर
विद्वत्तेची शान आणिली
अमुची स्वारी तिथें थडकली

कड कड टाळ्यांच्या गजरांत
झालें बाई, सुंदर स्वागत
गळां घातला, सुगंधि हार
हळदीकुंकू, गुच्छ मनोहर.

एकदाणी

परिचय करितां समाज सगळा
आतुर भाषण ऐकायाला
बोलायाला उभी राहिलें
पर्स उघडतां चाटच झालें.

कागद, पैसे, सारें कांहीं
जागेवरती कांहिच नाहीं
' ही काऱ्यांची असे करामत '
शिव्या मोजल्या लाख मनांत.

फांस खरोखर हार वाटला
गुच्छ जणूं अंगार भासला
सर्व शरीरा कंपचि सुटला.
उसना तो उत्साह निमाला

◆ ◆ ◆

## १६

# पूजा

जाईच्या फुलांचा वाहिला मीं लक्ष
 लावावया लक्ष तुझे पायीं
फुलांच्या राशींत गेला तूं लोपून
 नाहीं आठवण आली माझी
केल्या लक्ष वाती उजळल्या ज्योती
 परि तुझी मूर्ती सांपडेना
ग्रंथांचें वाचन श्रवण मनन
 केलें रे भजन तुझ्यासाठीं
उपासतापास केला अट्टाहास
 किती रे सायास केले देवा
केल्या तीर्थयात्रा तुझा शोध घ्याया
 नाहीं सांपडला कोठेंहि तूं
सत्पात्रीं मीं दान केलें अन्नदान
 आहे अभिमान पूर्ण मला
इतुकेंहि सारें व्यर्थ गेलें कां रे
 गूढ हें पडलें मना मोठें
आहेस तूं कोठें ? कुठें शोध घ्यावा
 दाखिव रे देवा मार्ग कांही
तुझ्या पूजनाला सारी बाह्य सृष्टी
 वाटते रे दृष्टी अपुरी ही

एकदाणी

शोधितें मी आतां माझी अंतःसृष्टि
देई दिव्यदृष्टी देवराया
पूजन सामग्री नको दुजी कांहीं
सांपडे सर्वही अंतरांत
क्षण हा प्रत्यय येतसे मनाला
टिकविणें याला तुझ्या हातीं
आहे सुभाषित प्रयत्नांतीं ईश
पावतो भक्तास विश्वास हा

◆ ◆ ◆

## १७

# माहेरचें मूळ

मूळ आलें माहेरचें आनंदली मनीं बाला
गोड गोड स्मृतिचित्रें आठवतीं हृदयाला
रम्य मुग्ध बाललीला मातापितरांची छाया
मैत्रिणींना भेटायाला धांव घेइ वेडी माया
नयनांत आनंदाश्रु मोतियाचे काय सर
ओघळले भराभर जप सखे रत्नहार
वायु सांगतो कानांत काय बाई हितगूज
समजलें, मूळ आलें माहेरचें तुला आज
आनंदाचा नाच चाले सखे तुझ्या मुखावरी
सौंदर्याला शोभा आली काय वर्णूं गडे थोरी ?

◆ ◆ ◆

१८

# आई

ती प्रेममूर्ति आई शोधूं कुठें मि आई ?
गेलीस टाकुनी कां निजबालकांसि आई
होतों लहान बाळें तव प्रेम ना मिळालें
तव मूर्ति आठवे ना वात्सल्य हाय ! गेलें
परि कीर्ति येइ कानीं तूं पुण्यशील होती
पसरोनि दिव्य तेज गेलीस स्वर्गलोकीं
होती तुझ्याच ठायीं सद्गूणसंपदा हीं
ती थोर ठेव काय आम्हां दिलीस आई ?
जन्मास ही पुरेल विश्वास हा मनांत
फुलवील जीवनांत दीपावली प्रशांत
मंथोनि सिंधु देवें रत्नेंच काढिलीं जीं
हे दोन वर्ण 'आई' रत्नें जणूं निघालीं
या दिव्य रत्नतेजें अंधार दूर जाई
ही कल्पना मनांत आई सदैव येई
असशील दिव्यलोकीं वा तूं कुठेंहि आई
श्रद्धांजली तुलाही माते शुभाशी देई

◆ ◆ ◆

## रक्षाबंधन

राखी पौर्णिमेचा सण शुभ्र मास ये श्रावण
बहिणीचा शुद्ध भाव राखी हेंच प्रेमचिन्ह
मृदु भावनेचे धागे विणुनियां अंतरंगीं
मोदें भावाच्या ग हातीं बहिण ही राखी बांधी.
बहिणीचें संरक्षण करायचा अधिकार
भाऊराया शीरावरी आनंदाने घेई भार
वर्षांतील सुखदुःख भावापाशीं सांगायचें
सौख्य होतें द्विगुणित दुःख अल्प भासतसें
धन, मान, जात, गोत होतें सर्व विस्मरण
राखी स्नेहाचें द्योतक भाऊ मिरवी भूषण
पौर्णिमेचा पूर्ण चंद्र रुप्याची हो बरसात
भावाचा हा प्रेमसिंधु शुद्ध स्नेहें उफाळत
अंतरींचें प्रेमरत्न दावीतसें दिव्य तेज
बहिणीला भाऊ देई रक्षाबंधनाचें मोल
विश्वबंधुत्वाचें प्रेम संपादणें आई धर्म
रक्षाबंधन हा नेम आज आला भाग्यदिन.

◆ ◆ ◆

२०

# नंदादीप

काळाच्या उदरांत ही कितीकशी, झाली पहा निर्मिती
सौख्याच्या कलशांत दुःख भरलें, मारावल्या या स्मृती
राजाची दुहिता सुहास्यवदना, लक्ष्मी जणुं ये घरीं
नंदादीप प्रशान्त हा उजळिला, शोभा खुलें मंदिरीं

लक्ष्मी आणि सरस्वती उभयतां, ज्या पूजिल्या देवता
झाला संगम गोड मंगलप्रभा, ये जीवनीं दिव्यता
तेजाचें प्रतिबिंब जें उमटलें, ' आई ' तुझ्या अंतरीं
नंदादीप प्रशान्त गे उजळिला, जो आपुल्या तूं करीं

लाभाया निजजीवनीं सफलता, तूं ओतिलें अंतर
केलें यत्न बहू परी न विजयी, झालीस मार्गावर
पुण्याई बहुमोल दौलत तुझी, जी जोडिली तूं करीं
नंदादीप प्रशान्त तूं उजळिला, दीपोत्सवाच्या सरी

गेलें सर्व निवून वैभव पहा, प्रासाद गेला जरी
नंदादीप प्रशान्त तेवत उभा, जो लाविला मंदिरीं.

◆ ◆ ◆

## बाळलीला

गोड बाळाचें हांसणें उधळले काय मोतीं ?
आईच्या ग अंतरांत उकलल्या स्वाति शुक्ती
गोड बाळाचें खेळणें रम्य क्रीडा तारकांची
वर्णायाला नाहीं वाचा गूढ शक्ति निसर्गाची
गोड बाळाचें रांगणें चंद्र ढगांतून चाले
पाठशिवणीचा खेळ अंतरंग मोहोरलें
गोड बाळाचें बोलणें हुंहुंहुंचे दिव्यबोल
सांगतांना मौन जडे फोल होती माया बोल
बाई बाळाचें रडणें हृदयाला बोचे खोल
कांटा रुततां बाळाला कोमेजते चित्तवेल
आईची ही वेडी माया नाहीं मुळीं याला मोल
शक्ति नाहीं सांगायाला कांहीं जरी दिलें मोल.

◆ ◆ ◆

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बा. क्र. ५३८९ नों. दिं ..........
वि. ..... आ. वा. ..... क्र. ..........

२२

## आशा

आशेनें जगतें सबंध जग हें आशा जगा वांचवी
वृक्षांना जल लाभतां बहरती येई नवी पालवी
कोणाच्या हृदयांत घोर पडला अंधार चोंहीकडे
आशा त्या वदते, प्रकाशकिरणें मी दावितें ये पुढें

डोळे हे उघडोनि नीट बघ रे बाळा खुळ्या हासुनी
विश्वोद्यान कसें झकास फुललें शोभा मनोहारिणी
लीलेनें प्रभुनें मना रमविण्या ही बाग लावीयली
प्रेमें घालितसें सदैव जल मी झाडें किती वाढलीं

कांटे वा असतील खांचखळगे मार्गीं तुझ्या रे मुला
दुःखाच्या उदरांत सौख्य वसतें ठावें न हें कां तुला ?
बाळा येइ पुढें प्रफुल्लित मनें मी दावितें वाट ही
प्रेमाचा बघ हा गुलाब फुलला तोडी फुलें गोड हीं

घेई हीं सुकुमार हातिं सुमनें हर्षे भरी ओंजळ
सोडी दुःख निराश होइ न कधीं चित्ता करी सोज्ज्वळ.

◆ ◆ ◆

२३

## गुपित

नको बाळे लपवूं ग मनांतील तूं गुपित
प्रतिबिंब उमटलें डोळे तुझे सांगतात
कोमेजल्या फुलावर आली नवी टवटवी
जलसिंचन कुणाचं गोड कृति कुणाची ही ?
मिटलेल्या पाकळ्यांना कुणी दिलं ग जीवन ?
सांग सखे सांग गडे सांग तुझा मित्र कोण ?
जीवनाच्या सतारींच्या कोण छेडते ग तारा ?
नाच तुझ्या मुखावर आंदोलन देई वारा
दैन्य दुःखामुळे तुझें लावण्य ग कोमावलं
दिव्य प्रेम लाभतांच नवपुष्प विकसलं
अलंकार नव्हते ग अंगावर घालावया
सौंदर्याचा साज ल्याली सदाचीच तुझी काया
सौजन्याची साधी ठेव आईने ग दिली हातीं
फिके सारें त्याच्यापुढे माणिक नी हिरे मोतीं
आहे जरी खरें बाई रत्ना लाभतां कोंदण
प्रकाशतां तेज चढे आहे नित्याचीच खूण
प्रेमाच्या ग कोंदणांत तुझ्या जीवनाचें रत्न
नित्य प्रकाशित राहो शुभेच्छा हो माझी पूर्ण.

◆ ◆ ◆

२४

## गूढ असें मोठें

हास लाडक्या, मधुर हास्य तें दावि गडे! बाळा
कुणी उचलतां बघुनि हासणें, एकच हा चाळा
हूं हूं करिसी बोल मुके हे रमविति चित्ताला
कुणी शिकविलें, सांग तुला हें, सांग गडे मजला ?
भूक लागतां सदा रडावें, एकचि हें ठावें
नाही चिंता दुजी मानसीं मोदें खेळावें
सज्जन दुर्जन भेद नाहि या निर्मळशा चित्तीं
ठाउक नाही कपटि जगाची बाळा तुज रीती
काळ वेळ तुज कांहि छकूल्या समजे ना बाई
सदा खेळणें, हसणें, डुलणें, दुःख मुळीं नाही
लुटुनि घेइ या अनुपम मोदा पूर्ण, गडे बाळा
जोवरि नाही कलिचा फिरला तुजवरती डोळा.
बाळ मनाची रम्य सरलता, जाइ पुढे कोठे
विचार करतां गुंग जाहलें, गूढ असें मोठें !

◆ ◆ ◆

## २५

# नशिबाचे खेळ

काढाया नवचित्र सुंदर असे, बाला कुणी कोमल
योजोनी नव पार्श्वभूमि स्वमनीं, ती झोपली निर्मल
आलें दैव हळूच टाकुनि पुढे, तो पाश काळा निळा
गेला कागद तो उडूनि गगनीं, वाराहि आला खुळा

झाली जागृत पाहते निरखुनी, दैवास डोळ्यांपुढें
आले नेत्र भरून भान नुरलें, चित्तास कोडें पडे
केला काय गुन्हा ? कशास करिसी, शिक्षा अशी सांग ना ?
नाही आजवरी कुणा दुखविलें, ना वंचिलें मीं कुणा.

शोधाया मन भूतकाळ सगळा, आलें त्वरें हिंडुन
नाहीं सांपडलें तया परि कुठे, कांहीहि तें कारण
' कोणाचा कधि घातपात करण्या, ना वेचिलें आयु मीं
दैवा कां मग कोप हा वद वृथा ? घे पाश तूं काढुनी. '

आहे एकच प्रश्न जो सलतसे, त्याचें असें उत्तर
जें आहे नशिबांत तें न टळतें, होई न स्थित्यन्तर.

• • •

२६

## गत-स्मृति

वेचिलीं जिथें मी सखे! फुलें
वाहतें तिथें मी अश्रुफुलें

जन्मभूमि ही हाय आमुची
दुर्दैवाने झाली पारखी
बालपणींच्या मंगल कालीं
वैभव शिखरीं दैव डुले.

फळाफुलांचा सखे बगीचा
रम्य सुशीतल प्रेमळ छाया
दिधल्या, परि बघ उजाड झाला
नव प्रमुदित हृदया खेळविलें.

उंच इमारत, उंच मनोरे
उंच शिखरहि भाग्य उदेलें
सदैव डोळे नभीं लागले
गजान्त कमला सदनिं झुले.

पाणिदार गे मोतिं टपोरे
हार गुंफिले, गळां घातले
खेळत असतां किती हरपलें
दुःख तयाचें कधिं न सलें

हृदयिंच्या ज्या मंगल आशा
दैव लाट ये बुडुनी गेल्या
जीवनसिंधू घोर उफळला
रूप मनोहर लोपविलें

स्वर्ग सुखाची सीमा सरली
वात्सल्याचीं नातीं तुटलीं
जगीं राहिलें मीच एकली
गतवैभव स्मरतां हृदय हले

◆ ◆ ◆

२७

# विकास

कळ्या विकसती मधू उपवनीं लता डोलती
फुलें उमलतीं किती मधुर हीं मना मोहिती
सुवास मधुमंद हा सुखवितो कळ्या गोजिऱ्या
विकास करिती वना खुलविती, पुरा आपुला.

अमोल निज जीवनीं उपवनीं मनाच्या कळ्या
चला विकसवूं विवेक करुनी, सदा चांगला
सदा मधुर बोलणें मधुर हासणें, जीवनीं
निराश नच व्हा धरा सतत थोर आशा मनीं. २

असे विविधता जगीं विविधज्ञान सांठा महा
कला विविध या किती पसरल्या सुविद्या पहा
क्षणोक्षणिं करा प्रयत्न मिळण्या अशी संपदा
विकास मग होउं द्या विकसवा मनाला सदा ३

◆ ◆ ◆

## २८

# विकासला आशीर्वाद

विविध ज्ञानाचें मूल्यवान सोनें
काय बाळा घातलें बाळलेणें ?
सजुनि केल्या वर्षांत रम्य लीला
अम्हाला तूं रमविलें खास बाळा

समय शुभ ये हा वाढदिवस आज
दाविलें निज थोर भाग्य तेज
विजय लाभो जाउं दे सुखें काळ
जयश्री तुज घालुं दे पुष्पमाळ

यशोगानीं दुमदुमवी दिशा दाही
शाहिरा रे ! नित मधुर काव्य गाई
लीन होई तूं ज्ञानदेवपायीं
होइ दीर्घायू , आशिवचन घेई—

◆ ◆ ◆

## २९

# जादूगार

निळ्या निळ्या आभाळांत देवाजीचें मोठें घर
खांबावीण उभारलें मंदिर हें छानदार
नाना रूपें बदली तो देवबाप्पा जादूगार
दिनीं सूर्य होवोनीया प्रकाशतो घरोघर
नियमानें सायंकाळीं होतो चांदोबा सुंदर
दगाआड छपाछपी खेळ खेळे मजेदार
चमचम चांदण्यांच्या ज्योती लावी मनोहर
छान रुपेरी चांदणें पसरतो जगावर
मेघ होवोनी पाडतो पाऊस हा सरसर
अन्न मिळे आपणाला थोर याचे उपकार
रोज रोज भेटतसे देवबाप्पा जादूगार
शक्तिबुद्धीचा हा दाता करुं याला नमस्कार

◆ ◆ ◆

३०

## गोड दूध

सुखवावया जगाला नभिं पूर्णचंद्र आला.

नव तेज पौर्णिमेचें बघ, चांदणें सुखाचें
मधुबिंदु अमृताचे देई वसुंधरेला
सुखवावया जगाला नभिं पूर्णचंद्र आला.

नभिं अंतरांत अपुल्या मनचंद्र हा खुलावा
आनंद हा लुटाया भागिनीसमूह आला
सुखवावया जगाला नभिं पूर्णचंद्र आला.

सुविचार दुग्ध सेवा ऐक्याचि शर्करा घ्या
निज सत्त्व चांदण्यांत नित गोड गोड बोला
सुखवावया जगाला नभिं पूर्णचंद्र आला.

◆ ◆ ◆

३१

## मला बाई नाहीं वेळ

शेजारिणीबाई मला नको देऊं आमंत्रण
माझ्या घरीं आहे आज महालक्ष्म्यांचा सण
काव्य वाचन कशाचें ? कशाचें ग तें साहित्य ?
काढूनियां ठेविते मी आज सणाचें साहित्य
पांच पन्नास पानांचें माझ्या घरांत जेवण
काव्य वाचून होईल सांग कसें समाधान ?
भाजीपाल्याचा विचार मनीं घोळतीं पक्वान्नें
शब्द लपले चुलींत कशाचें तें काव्यगाणें
पाट रांगोळ्या फुलोरा अंगावर अलंकार
सुचणार कसे मग अनुप्रास अलंकार ?
येणार त्या येऊं देत सुप्रसिद्ध कवयित्री
मला बाई नाहीं वेळ चुलीशींच माझी मैत्री

शेजारिणीबाई नको राग मानूं बोलण्याचा
आधीं प्रपंच साधावा धर्म हाच बायकांचा

◆ ◆ ◆

३२

## आम्ही राजाच्या हो पोरी

आम्ही राजाच्या हो पोरी  नाही ठाऊक आम्हांला
कशी जीवाची काहिली कसा असतो  उन्हाळा
जाईजुईचे मंडप थंड सुगंधित वारा
मखमली पायवाटा नाही कांट्यांना हो थारा
नाही दुजी कुजबूज पक्षीवृंद संगतीला
नृत्य गोड मयूरांचें चित्त सदा रंजवाया
आम्ही राजाच्या हो पोरी जग सारें महालांत
कल्पना त्या कशा याव्या काय चाले जगतांत ?
उंच सौधावरी जावें प्याव्या अमृताच्या धारा
आपल्यांत व्हावें दंग खालीं बघणें कशाला ?

◆ ◆ ◆

संग्रहा…
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## ३३

## समुद्रशोभा

गोड तुझ्या लीला मनाला मोहविती सागरा
गमे मना मोहिनी जगाला भूषविसी सुंदरा

नाचविसी या मोहक लाटा
आनंदाचा अनुपम सांठा
देशील मज कां लवही वांटा ?
शांतविण्या अंतरा, मनाला मोहविसी सागरा

जिकडे तिकडे अथांग पाणी
रिझविसि मानस गाउनि गाणीं
नाद मधुर हा घुमतो कानीं
देसि खरा आसरा, मनाला मोहविसी सागरा

निसर्ग सुंदर तव ही काया
रूप मनोहर मोहवि हृदया
द्वैतभाव हा जाई विलया
पावविसी ईश्वरा, मनाला मोहविसी सागरा

◆ ◆ ◆

## ३४

# सृष्टिदेवतेस

शांत हांसरी प्रसन्न बघुनि मूर्ति मंगले
मोहिनीच भासतेस रम्य रूप पाहिलें

देवि तूं वनांतली
नेसलीस पैठणी
गहन हरित, शांत करिसी, अंतरंग कोमले

तरुलता ग मैत्रिणी
खेळतात साजणी
हसत हसत ये वसंत, खुलविण्यास प्रेमले

जीवनांत माधुरी
ओतिलीस तूं पुरी
नयनरम्य मानसांत गोड रूप बिंबलें

◆ ◆ ◆

३५

## हृदयाची राणी

भरला सागर बघ रत्नाकर सरितांचा राजा
चल ये जाऊं स्नान करूं चल, चल लौकरि राजा
लाटांवर या लाटा खळखळ सुरेल संगीत
पंचारति या घेउनि आल्या, सरिता हर्षीत
ओवाळाया पतिला करिती रक्ताचें पाणी
मी तर राया तव हृदयींच्या हृदयाची राणी

सहस्र लाटा तुझ्या संगतीं, घ्याया उत्सुकता
कशास करिसी विलंब चल ये, दे लौकर हाता
खेळत खेळत जाऊं चल ये, सखोल पाण्यांत
बुडतां मी जरि तारशील हा हृदयीं विश्वास
आनंदानें आलें बघ हें डोळ्याला पाणी
मी तर राया तव हृदयींच्या हृदयाची राणी

भरून घेऊं कलश पुरा हा या आनंदाचा
अमोल सांठा जीवनभर हा पुरेल भाग्याचा
कशास मग तें दुजें धन मनीं पूर्ण समाधान
या चित्ताचें अनन्य हृदयें देइन मी दान
नकली मोत्यां येइल कधि का मोत्याचें पाणी ?
मी तर राया तव हृदयींच्या हृदयाची राणी

◆ ◆ ◆

## ३६

## शपथ

रक्ताचीच पहा वदे शपथ मी आई! तुझ्या निर्मल
डोळ्यांतील प्रशांत सात्त्विक छटा, पाहोनि तेजोबल
ज्या ज्या इच्छित कामना तव मनीं अर्ध्याच गे राहिल्या
त्या त्या पूर्ण करीन खास जननी आशीर्वचा दे मला.

पुण्याई तव थोर गे! म्हणुन हो सारेंच माझें धन
कार्याची करण्यास पूर्ति बघ हें आयुष्यही वेचिन
व्हाया स्मारक गे चिरंतन नवें स्वर्गांतल्या देवता
हातीं घेतिल हात येतिल मुदें देतील तेजस्विता.

तत्त्वें मंगल ओविलीं निजकरीं, हें बांधिलें कंकण
अश्रूंच्या जलसिंचनीं भिजविलें, साधावया पूजन
आई ! मी मिळवीन फूल न जरी, वाहीन ही पाकळी
लाखांची अनमोल मूठ अपुली, अर्पीन पायातळीं.

◆ ◆ ◆

## ३७

## चाफा मनींचा हासतो

आज गोड सुखस्वप्नें   साकारलीं माझीं सारीं
रसरशीत या केळी   डोलतात माझ्या दारीं
हिरवीं हीं रुंद पानें   रुंदावल्या भाग्यरेषा
जीवनाच्या सायंकाळीं   काय प्रगटली उषा ?
आलें एक केळफूल   घड केळीचा डुलतो
भाग्यवृक्ष बहरला   चांफा मनींचा हासतो

◆ ◆ ◆

## ३८

# सुंदर कला

केला साज नवा, किती नटविली, तूं आपुली गे कला
नाट्याची नव पैठणी खुलतसे, संवाद कुंकू टिळा
पद्यांचा नव चंद्रहार झळके, हें गद्य-हीं कंकणें
भाषा ओघवती पदीं ठुमकती-या तोरड्या पैंजणें

आली ही गति गोड दावित कला, थाटांत सौदामिनी
लीलानृत्य करी, विमोहित करी, ही घालिते मोहिनी
मूर्ती ही मयुरासनीं डुलतसे, मांगल्यसंवर्धिनी
झाला दंग समाज हर्षित मनें, शोभा मनोहारिणी

नक्षत्रांत प्रशांत चंद्र चमके तैसी कला सुंदर
तारा भोवतिं बालिका पसरल्या, हें दृश्य चेतोहर
राणी येत निशा सुहास्यवदना खेळांत खेळावया
शोभादायक पार्श्वभूमि खुलली नाट्यास रंगावया

आहे दुग्ध मुळांत गोड विमले तूं घातली शर्करा
होई गोड प्रसंग हा तुजमुळें, हा भास वाटे खरा.

◆ ◆ ◆

## ३९

# अंतिम इच्छा

अक्षरांच्या समूहाचें एक बांधावें मंदिर
विसाव्याला लहानशी जागा करावी सुंदर
नव्या नव्या कल्पनांचे जावे शोधाया पाषाण
अल्पशक्तीने हें काम करूं जावें वाटे पूर्ण
प्रतिभेचे बोलवावे कुणी कुणी शिल्पकार
खोदवावी पाषाणांत तुझी मूर्ति मनोहर
तुझी सारी प्रभावळ येईल ग आपोआप
डोळे भरुन पाहीन माते तुझें दिव्य रूप
सौंदर्याचा आविष्कार होवो किंवा न होउं दे
मंदिराच्या गाभाऱ्यांत चित्त मोर हा नाचूं दे
कांहीं नाही माझ्या हातीं आशा देते परि धीर
तुझें पूजन साधाया घेतें नेत्रांतील नीर
उल्हासाच्या बागेतील मूक गोड भाव कळ्या
वाहीन मी तुझ्यापायीं सुगंधित उमलाया
मुग्ध आनंद नैवेद्य अर्पणार मनांतला
नेत्रनीरांजने दीप उजळीन दीपमाला
एक अंतिम ही इच्छा उरला हा एक तंतू
मनोमनीं हृद्‌गत हें पुरवावा सान हेतू

◆ ◆ ◆

# सु-मन माळ

झाली पहाटेची वेळ आकाशांत शुक्र तारा
अस्तंगत होतां, वाही झुळुझुळू गार वारा

तारकांची रत्नपेटी निशाराणी लपविते
आवरते खेळ सारा हळूहळू गुप्त होते
पाखरांची किलबिल झाडावर झाली सुरू
गोठ्यांत हें हंबरतं कपिलेचं ग वासरूं

अंगणांत पारिजात गंध गोड दरवळे
रूप रुचिर पाहोनि विकसती भावफुलें
वेलीवर फुलें सारीं हांसतात उमलून
दंवबिंदू मौक्तिकाचे सर गेले ओघळून

माळा घेऊं का गुंफोनी घालुं कोणाच्या ग गळां ?
मांगल्य हें सांपडेना कोण स्वीकारील माळा ?
नको सुई नको दोरा निसर्गाच्या केळींतला
काढतें मी साधा दोरा सुमहार गुंफायला.

गुंफतांना अंतरंग आलें बाई बहरून
काय सांगूं कोणा कसें सांगतां ना येई खूण
मांगल्याचा सडा कोणी घातला ग उल्हासानं
कुणी काढिती रांगोळी सुंदरशी कलापूर्ण

एकदाणी

कोकिलांच्या कूजनांत स्थिर झाल्या चित्तवृत्ती
शुभकृती सुचवीती येणार ग प्रभूमूर्ती
आहे भाव तेथें देव प्रचीतिही आली मना
हार माझा झाला पुरा कल्पनेंत रंगतांना.

◆ ◆ ◆

४१

## कवितेस

आहे एक जगांत तूंच कविते माझी खरी मैत्रिण
जीवा शांतविते, मना रमविते, बाई तुझें भाषण
आहे हीं अपुलीं अभिन्न हृदयें, हेवाहि वाटो कुणा
तूं साधी तशि मीहि साधि कविते, हासो कुणी आपणां·

जातां मी कधिंही कुठेंहि सखये, येतेस तूं सोबती
धैर्यानें मज दाविसी पथ सदा, आभार मानूं किती
जाई काळ सुखें भराभर गडे, मैत्रींत ये गोडवा
तूं साधी तशि मीहि साधि कविते, हांसो कुणी आपणां.

सौख्येंही द्विगुणीत होति सखये, लाभे खरी शांतता
दुःखाचे क्षण अल्प भासति सदा, होई कमी तीव्रता
आहे तूं अजुनी लहान जरिहीं, चित्तांत मोठेपणा
तूं साधी तशि मीहि साधि कविते, हांसो कुणी आपणां.

होतां मी कधिंही हताश हृदयीं, बोधामृताचा झरा
दावोनी करिसी प्रफुल्ल मन हें, आधार देसी खरा
आहे ही किमयाच अद्भुत गडे, आहे निराळेपणा
तूं साधी तशि मीहि साधि कविते, हांसो कुणी आपणां.

◆ ◆ ◆

एकदाणी

# विहीण

कोडकौतुकानें आम्हीं आजवरी वाढवीली
गुणाची ही गोड लेक आज आपणाला दिली
चालीरीति शिकविल्या उच्च शिक्षणही दिलें
सु-स्थळ हें पाहोनिया बालिकेला उजवलें
देणगींही अल्पशक्ती दिली तुम्हां गोड करा
हृदयिंचा थोर ठेवा तुम्हा हातीं सोंपवीला
सुज्ञ तुम्ही जाणूनिया कुलशील पाहुनीया
सुशिक्षित या वराला अर्पियली आम्हीं बाला
पहिलीच माझी बाळ लाडाची नि कौतुकाची
भावंडांत रंगलेली हौस दीर-नणंदांची
माझी गुणाची शालन प्रेमें करावी जतन
शोभतसे हिरकणी कधीं लाभतां कोंदण
पाठीवरी मायेचा हो फिरवाल तुम्ही हात
विसरेल बाळ माझी माहेरचें गणगोत
अवखळ बाळ माझी हृदयाची साधी भोळी
सौजन्याचा साज घाला घेउनीया मांडीवरी
नाहीं आपण विहिणी ठेवा नातें बहिणींचें
सोडा हो त्या रुसव्याला जास्त काय सांगायाचें ?
देउनीया बाळ माझी घेतला मी बाई बाळ
भाग्य येई उदयाला आला बाई शुभ काळ
बाई माहेरवाशीण खणानारळानें ओटी

भरुनिया, घातली हो आज ओटींत हीं बेटी
आज माझी हिरकणी जातसे हो सासराला
माहेरच्या मंडळींना नावरती अश्रुधारा
दिन आला सोनियाचा राहे ना हो वेडी माया
कन्येसम वागवावी करुनिया प्रेमछाया
हौस आहे आपणाला हौसेला हो नाहीं मोल
पुरवाल सारी हौस मन आहे समतोल
माहेरच्या आठवणी सासरचा गोड घास
लाखमोल दौलत ही पूर्ण मनीं हा विश्वास
तुमचीच ही शालन सून सर्वस्वीं हक्काची
राजाराणी जन्मभर होवो संसारांत सुखी

◆ ◆ ◆

एकदाणी

४३

## आस

पेला भरूनीया दिला पूर्ण भरून सांडला
' पुरें ' म्हणायाचें भान मुळीं राहिलें न मला
कसा करूं रिकामा हा नको वाटे कल्पना ती
ओठ लावूंच कशाला ? नुसताच असो हातीं

◆ ◆ ◆

४४

## कृतज्ञता

वेळीं अवेळीं मी आलें तुझ्या दारीं
तरीहि दिलीस झोपाया ओसरी
थकलेला जीव माझा विसावला
औदार्याचें मोल कळलें मनाला

• • •

## काळ

जाई काळ पहा भराभर पुढें कोणी हसो वा रडो
सौख्याच्या शिखरावरी कुणि चढो, दुःखांत कोणी पडो
दारिद्र्यें कुणि गांजिले, धनभरें कोणी सुखी जाहला
पाही कां परतोनि काळ कधिं हा ? वेगें पुढें चालला !

आईच्या जवळोनि नेइ छकुलें, दुःखार्णवीं लोटुनी
मृत्यूच्या वदनीं कितीक पडती माता मुलां सोडुनी
दुर्दैवें दुरवे पिता, सुत पहा राही जगीं एकला
पाही कां परतोनि काळ कधिं हा ? वेगें पुढें चालला !

लक्ष्मीवंत कुणी दरिद्रि बनले, दारिद्र्य जे भोगती
लक्ष्मीची फिरतांचि दृष्टि जन ते श्रीमंत झाले किती
देशासाठिं कुणी तनू झिजविल्या संसारही सोडिला
पाही कां परतोनि काळ कधिं हा ? वेगें पुढें चालला !

झालीं निर्जन हो कितीक नगरें भूकंप होवोनिया
रानें हीं फुललींच नंदनवनें, सौंदर्यशाली पहा
काळाच्या उदरांत होति घटना वाईट नी चांगल्या
पाही कां परतोनि काळ कधिं हा ? वेगें पुढें चालला !

शोकाच्या वणव्यांत हाय पडले जे जीवनीं पोळले
काळावांचुन अन्य औषध नसे, शांती तया ना मिळे
काळाचे उपकार थोर जगतीं, होती किती आजला
पाही ना परतोनि काळ कधिं हा ? वेगें पुढें चालला !

◆ ◆ ◆

एकदाणी

# महाराष्ट्र शारदेस

महाराष्ट्र श्रीशारदे काव्यदेवी तुझें रूप मीं पाहिलें लोचनीं
यशोगायनीं चित्त हे दंग झालें, मला गुंग केलेंस तूं मोहिनी—
महापर्वणी लाभ झाला गमे हा रसज्ञा मिळे दिव्य संजीवन
जयांनीं तुला घातला साज, हिंदी–मराठी कवींचेंच संमीलन
कुणीं घातल्या दिव्य कंठांत माळा, दिले गे कुणी गुच्छ हें सुंदर
स्त्रियांनीं करीं घातलीं कंकणें हीं, हरिद्रा खुले कुंकु भालावर
तुझी वेषभूषा तसें रूपलावण्य, नाविन्य हें ओतलें भूषणीं
अलंकार सारे हिरे शोभती हे कवी, दिव्य कंठांतले तन्मणी
नव्या मंदिराचे जयस्तंभ सारे तुझ्या कीर्तिचीं हीं नवीं दालनें
उभारावयाला कवि सिद्ध झाले नसे दिव्यतेला कुठेंही उणें
नव्या जाणिवेचे नवे भक्त सारे, मनें आमुचीं जागती सर्वसदा
यशोदुंदुभीच्या निनादें घुमूं दे, महाराष्ट्र देशास दे संपदा

◆ ◆ ◆

## ४७

# रांगोळीस

घाव सोसून सोसून मिळविलें देवपण
कण सार्थकीं लागती आहेस तूं खरी धन्य
पूर्वी होतीस दगड कुणी उपेक्षा करावी
मनांतल्या मनांतच तरी आशा फुलवावी
‘ कुणी येईल भुकेला त्याला देईन जीवन ’
कधीं तरी केव्हां तरी सार्थ होईल जीवन
झाला बाई तुझा खरा आशावाद जीवनांत
देवपण प्रगटलें लाखमोलाची दौलत
आम्ही घेऊन हातांत सार्थ करितों जीवन
तुझ्यामुळें लाभलें ग ‘ कलावंत ’ गोड नाम
पंगतीस खरी शोभा तूंच देतेस मोलाची
तुझ्यामुळें तुझ्यामुळें लागे किंमत तोलाची
तूंच शोभा अंगणाची तूंच देवता घराची
मूर्तिमंत प्रसन्नता दाखविसी अंतराची

◆ ◆ ◆

अनुक्रम.............
विभाग...............
क्रमांक ...............
नों. दि.........

## ४८

# हृदयाचें सिंहासन

हृदयाचें सिंहासन केव्हांचेंच सजवीलें
मूर्ति शोधतां शोधतां नेत्र मिटाया लागले
अर्धवट होती गुंगी होती किंचित जागृती
अचानक कुठूनशी चाहूल ये पावलांची
सिंहासनीं बघितली तुझी आकृति मोहक
कळलें ना परि देवा जागृति कीं स्वप्न एक
साकारली का तपस्या हृदयींचा देव आला
ज्याच्यासाठीं जन्मभर दुःखभार मीं साहीला
अश्रूंचीं हीं प्रेमफुलें तुझ्या चरणीं वाहिलीं
रूप कसें बघणार दृष्टि बघ पाणावली

◆ ◆ ◆

५३८९

# ४९

## देवीस्तवन

देवी अष्टभुजे नमो भगवती लक्ष्मी नमो पार्वती
बुद्धी, वैभव, शक्ति तूंच जगती, तूं अष्टधा प्रकृती
आहे भारत–स्त्री तुझें प्रतिक गे सौंदर्यशीलावती
स्त्रीचें मंगलरूप तूं विजयिनी सामावली संस्कृती

हातीं सुंदर शोभतें कमल हें निर्लेपता कोमल
गीता ज्ञानप्रदीप हा झळकतो तेजस्वि बुद्धीबल
अग्नीकुंड प्रदीप्त दावित तुझें पावित्र्य तें उज्ज्वल
त्यागाची रमणीय मूर्ति हंसरी सौंदर्य तें मंगल

आहे हा त्रिगुणी त्रिशूल विजयी त्रैलोक्यि पावे जय
झेंडा हा भगवा वरी फडकतो वैराग्य तेजोमय
आहे ही तलवार दंड रिपुसी सद्धर्म साधावया
शोभे ही स्मरणी सदा स्मरण दे कर्तव्य पाळावया

तूं आहेस वरप्रदायिते अये ! भगवती भक्तांसि संजीवनी
माते मंगल सिंहवाहिनि सती विश्वांत तूं मोहिनी
लक्ष्मी सुंदर पार्वती भगवती हे शारदे शोभने
दीनोद्धारिणि अंबिके तुज असो [illegible] वंदनें.

अनुक्रम ..........
विभाग ..........
क्रमांक ..........
नों. दि. ........
ग्रंथालय शाखा

IRBK-0105389